शासन निर्णय शुध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत लोकसेवा, नियम कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपीलीय अधिकारी प्रसिध्द करणेबाबत....

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय शुध्दिपत्रक क्रमांक :- सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११- अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक:-२० सप्टेंबर, २०१७

वाचा :-

१) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - ३१, दि.२१.०८.२०१५

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक-डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दि.०५.१२.२०१६

३) कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्रमांकः सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११-अे, दि.२१.०१.२०१७

४) कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्रमांकः सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११-अे, दि.२८.०४.२०१७

५) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृ.या.उ.अ./२०१७-१८/१७०/गुनि-५/२०१७, दि.२०.०५.२०१७

६) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. विप्र-७/आउयो/विघयो/संकीर्ण/२७७/२०१७, दि.२९.०५.२०१७

प्रस्तावना :-

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम - २०१५ दि.२१.८.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम-३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियम लागू झाल्यानंतर ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलिय अधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे.

२. कृषि विभागातंर्गत देण्यात येणाऱ्या विविध सुविधांपैकी शेतकरी केंद्रबिंदू मानून, शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या आणि ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फायदा घेतला आहे अशा महत्वाच्या सेवांपैकी केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध योजनातंर्गत वाटप करण्यात येत असलेल्या कृषि उपयोगी औजारांच्या थेट लाभ हस्तांतरण धोरणानुसार लाभार्थ्यांकडून होणाऱ्या खरेदीसंबंधी अनुज्ञेय अनुदान संबंधीताना विहीत कालावधीत हस्तांतरीत करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम-३ नुसार दि.२८.०४.२०१७ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मात्र कृषि आयुक्तालयाने आता सादर केलेल्या प्रस्तावानुसार सदर शासन निर्णयामध्ये अंशत: सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. कृषि आयुक्तालयाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने साकल्याने विचार करुन शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय शुध्दिपत्रक :-

शासन निर्णय कृषि व पदुम विभाग दि.२८.४.२०१७ अन्वये विहित करण्यात आलेली समयमर्यादा आणि पदनिर्देशित अधिकारी यांच्या संदर्भात अंशत: बदल करण्यात येत असून त्याबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत संबंधित जिल्हयांचे पदनिर्देशित अधिकारी म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याबरोबरच जिल्ह्याचे कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनाही पदनिर्देशित अधिकारी म्हणून अधिसूचित करण्यात येत आहे."

३. प्रस्तुत शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२०१४२९१२७४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f4ebb91d526d59e93b9365fba816854d2dfa38e53ed59ae4b31ba8260ba52882, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2017.09.20 14:18:49 +05'30'

(श.बा. पावसकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अप्पर मुख्य सचिव (नियोजन विभाग) मंत्रालय, मुंबई
२) आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) कुलगुरु, कृषि विद्यापीठे (सर्व)
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई -२५
६) कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) कृषि संचालक, (सर्व) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
९) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
१०) कृषि विकास अधिकारी (सर्व जिल्हा परिषद)
११) महालेखापाल-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
१२) महालेखापाल -२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
१३) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१४) निवडनस्ती (११-अे)